महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२३-२४/२०२४/ 2071 दिनांक : १६.०५.२०२४

**महत्वाचे परिपत्रक:**

16 MAY 2024

**प्रति,**
**प्राचार्य,**
**शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित**
**पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी सर्व अभ्यासक्रमांच्या संस्था**
**पुणे विभाग.**

**विषय : सन २०२४-२५ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरिता निधी वितरीत करणेबाबत..**

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. तंनिवि-१५२४/प्र.क्र.१३६/२४/तांशि-३ दि. १४ मे, २०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भाधित शासन निर्णयान्वये 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना' या योजनेंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेल्या व पात्र ठरलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याकरीता चालू वर्षी अर्थसंकल्पित झालेल्या रु. ९९८.०० कोटी इतक्या निधीपैकी रु. ३,२१,००,००,०००/- (अक्षरी रुपये तीनशे एकवीस कोटी फक्त) इतका निधी संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांना काही अटी व शर्तींच्या अधीन राहून आहरीत व वितरीत करण्यास मान्यता मिळाली आहे. सदर रक्कम संदर्भिय शासन निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत वाटप करणे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेबाबतचे निर्देश प्राप्त आहेत.

दिनांक १५.०५.२०२४ रोजीच्या महाडीबीटी संकेतस्थळावरील डॅशबोर्डनुसार, या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील संस्थाकडे उपरोक्त योजनेचे संस्था स्तरावर (Pending At Institute) ३३०९ अर्ज प्रलंबित असून विद्यार्थ्यांकडे दुरुस्तीसाठी परत पाठविलेले (Sent back to applicant) ३७९३ अर्ज प्रलंबित असलेबाबत निदर्शनास येत आहे. यानुसार संस्थांकडून अद्यापपर्यंत एकूण ३३०९ + ३७९३ = ७१०२ अर्ज येणे अपेक्षित आहे.

सर्व संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे महाडीबीटी लॉगीनमध्ये तसेच विद्यार्थ्यांकडे दुरुस्तीकरिता परत पाठविलेले ईबीसी शिष्यवृत्तीचे प्रलंबित असलेले ऑनलाईन अर्ज नियमानुसार तात्काळ तपासून या विभागीय कार्यालयाकडे पुढील तपासणीसाठी ऑनलाईन रित्या पाठवून द्यावे. जेणेकरुन शासनाकडून प्राप्त निधी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना/संस्थांना वितरीत करण्यास विलंब होणार नाही.

काही संस्थांनी खोटी माहिती सादर करुन अपात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज पुढे पाठवून शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्याबाबत यापूर्वीच्या तपासणी अहवालावरुन असे लक्षात आले आहे. संस्थांकडून अनावधनाने अशी चूक झाली असल्यास त्यांनी तात्काळ अपात्र विद्यार्थ्यांची संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम या विभागीय कार्यालयास जमा करावी. तसेच याबाबतीत संस्थांनी जाणून बूजून चूक केली असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा संस्था दोषी आढळल्यास सदर संस्थेच्या अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करणे/फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्ये या व अशा स्वरुपाची कार्यवाही करण्यास संचालनालयाकडे शिफारस करण्यात येईल याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत आहे किंवा नाही याकरिता या विभागीय कार्यालयाकडून संस्थांना भेट देऊन तपासणी करण्यात येणार आहे. तरी सर्व संस्थांनी त्यांचे संस्थेतील शिष्यवृत्तीचे नोंदी कागदपत्रांसह अद्ययावत ठेवाव्यात. जेणेकरुन तपासणी पथकास योग्य तपासणी करुन तपासणी अहवाल संचालनालयामार्फत शासनास सादर करता येईल.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.